सकाळ TODAY
कोल्हापूर, मंगळवार, १ जुलै २०२५

# शिक्षणाला मिळाले नवे रुप

## क्लासरूम ; बदलत्या काळानुसार वाटचाल

01/07/2025


कोल्हापूर : न्यू कॉलेजने ई-लर्निंग अंतर्गत ई-कंटेट निर्मितीसाठी स्वतःचा स्टुडिओ उभारला आहे.


कोल्हापूर : महाविद्यालयांमध्ये इंटरॲक्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे.


**बदलती महाविद्यालये**
भाग- १

### व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामवर नोटस्

सोशल मीडियावरील व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करून त्यावर महाविद्यालयांतील प्राध्यापकांकडून नोटस् पाठविल्या जातात. प्रथम; द्वितीय, तृतीय असे वर्षनिहाय ग्रुप तयार केले आहेत. त्यात परीक्षा, शैक्षणिक उपक्रमांची माहितीही विद्यार्थ्यांना दिली जाते. परीक्षाविषयक कामात गुगल फॉर्मचा वापर केला जातो. गुगल क्लासरुम, मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्स (मूक), यू-ट्यूब, स्वयंम, दीक्षा प्रणालीचा उपयोग करण्यात येत आहे. झूम, वेबेक्स, गुगल मीटच्या माध्यमातून ऑनलाईन लेक्चर घेण्यात येत असल्याचे विवेकानंद कॉलेजचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांनी सांगितले.

### 'लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम'चा वापर

बहुतांश महाविद्यालयांनी लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमचा (एलएमएस) वापर सुरू केला आहे. त्यावर ऑडिओ-व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. नैसर्गिक आपत्ती अथवा काही कारणास्तव विद्यार्थ्यांना वर्गात येणे शक्य नसल्यास त्यांना या सिस्टीमच्या माध्यमातून घरबसल्या अथवा कुठूनही आणि कधीही शिक्षण घेता येते. 'एलएमएस'च्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याची निर्मिती, विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासह मूल्यांकनही महाविद्यालयांकडून केले जात आहे.

### दृष्टिक्षेपात जिल्हा

| तालुका | महाविद्यालये | शिक्षक | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|---|---|
| करवीर | ४० | १२८६ | २३९७६ | २०९७९ |
| हातकणंगले | २२ | ५३७ | ९३७३ | ८३२८ |
| पन्हाळा | १३ | ३११ | ५७९४ | ३३५३ |
| गडहिंग्लज | १३ | ४५२ | ६१४१ | ५३१४ |
| कागल | ९ | १७० | ३०३१ | ३७४७ |
| शिरोळ | ८ | ११६ | ३१०५ | २६२१ |
| चंदगड | ६ | १३८ | २२७४ | २००४ |
| राधानगरी | ६ | ९१ | ७९१ | ९७९ |
| शाहूवाडी | ५ | ९९ | ११५८ | १३३५ |
| भुदरगड | ३ | ५३ | १३३३ | १५०७ |
| आजरा | २ | २९ | ११०८ | ८३८ |
| गगनबावडा | २ | ६८ | १४७८ | ५०० |
| एकूण | १२९ | ३३५० | ५९५६२ | ५१५०५ |

"पुस्तकांबरोबरच डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. महाविद्यालयांच्या बदलत्या स्वरुपाचा चांगला परिणाम दिसून येत आहे. विद्यार्थ्यांचाही त्याला सकारात्मक प्रतिसाद आहे.

**- डॉ. व्ही. एम. पाटील**, सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयांनी बदल स्वीकारले आहेत. त्यात इंटरॲक्टिव्ह बोर्ड, डिजिटल-स्मार्ट क्लासरूममुळे शिक्षण देण्याच्या पद्धतीला आधुनिक स्वरूप मिळाले असून, ते निश्चितपणे विद्यार्थी, महाविद्यालयांना उपयुक्त ठरत आहे.

**- डॉ. आर. आर. कुंभार**, प्राचार्य, विवेकानंद कॉलेज

हॅलो प्रभात

# विवेकानंद कॉलेजमध्ये जॉब ट्रेनिंग व फील्ड प्रोजेक्ट उपक्रम

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

नवीन शैक्षणिक धोरण नुसार विवेकानंद कॉलेज च्या विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने बी एस सी भाग विधर्थ्यांचे दि. २६ ते २८ या दरम्यान जॉब ट्रेनिंग व फिल्ड प्रोजेक्ट हे उपक्रम झाले.सदर उपक्रमासाठी महाविद्यालया चा माजी विद्यार्थी पृथ्वीराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले



पहिल्या दिवशी विविध औद्योगिक क्षेत्र मधून बाहेर पडणारे सांडपाणी, त्या वर करावी लागणारी प्रक्रिया व तपासणी यावर विद्यार्थ्यांनी प्रयोग शाळेत प्रात्यक्षिक केले दुसऱ्या दिवशी जिल्हापरिषद कार्यलाय कोल्हापुर येथे बसवण्यात आलेल्या बायोगॅस प्लांट ला भेट देणेतआली जिथे कॅन्टीन किचन मधून तयार होणाऱ्या कचऱ्या पासून बायोगॅस तयार होतो याचे प्रात्यक्षिक विद्यर्थ्यांनी अनुभवलेतिसऱ्या दिवशी सांगली येथे युिष फ्रुट प्रोसेससिंग व कॅनिंग सेंटर येथे फळ प्रक्रिया करून त्या पासून तयार होणारे पदार्थ याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी केलेसदर उपक्रमासाठी महाविद्यालया चे प्राचार्य डॉ आर आर कुंभार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ.श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले तसेचप्रा.एस.जी. कुलकर्णी व डॉ.एस.बी.मुल्ला यांचे सहकार्य लाभले. यामध्ये बी एस सी भाग ३ च्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

लोकमत
कोल्हापूर, मंगळवार, दि. १ जुलै २०२५

# पहिल्या दिवशी १६८१ विद्यार्थ्यांनी घेतले प्रवेश

## महाविद्यालयांत झुंबड : अकरावीची प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अकरावीची गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाल्यानंतर अलॉटमेंट झालेल्या जिल्ह्यातील १६८१ विद्यार्थ्यांनी सोमवारी विविध कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतला. यामध्ये विज्ञान शाखेच्या ९३९, कला शाखेच्या ४१० तर वाणिज्य शाखेच्या ३३२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत असतानाही विद्यार्थ्यांसह पालकांनी रांगेत उभा राहून प्रवेश निश्चित केले.

अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेशाची सर्वसाधारण अंतिम गुणवत्ता यादी शनिवारी सायंकाळी जाहीर झाली. यात पहिल्या फेरीत २१ हजार विद्यार्थांची अलॉटमेंट झाली.

**२८५**
कनिष्ठ महाविद्यालयांत ६६,०१० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया



अकरावीची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर सोमवारी कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी उसळली. छाया : आदित्य वेल्हाळ

जिल्ह्यात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठी २८५ कनिष्ठ महाविद्यालयांतील ६६ हजार १० जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

पहिल्या फेरीसाठी ४१ हजार ८९९ ऑनलाइन नोंदणी झाली होती. त्यानंतर व्यवस्थापन, इन-हाऊस कोट्यामध्ये १५७९ प्रवेश झाले आहेत. पहिल्या फेरीत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांना ३० जून ते ७ जुलैदरम्यान प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करता येणार आहे. ९ जुलै रोजी प्रवेशाची दुसरी फेरी सुरू होणार आहे.

जिल्ह्यात शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ संलग्न ३० महाविद्यालये आहेत. यात १५ हजारांहून अधिक प्रवेश क्षमता आहे.

अभियांत्रिकी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर झाले असून ऑनलाइन नावनोंदणीस प्रारंभ झाला आहे. कागदपत्रे पडताळणी व कन्फर्मेशन करण्यासाठी ३० जून ते ९ जुलै, १२ जुलैला तात्पुरती गुणवत्ता यादी, १३ ते १५ जुलैदरम्यान गुणवत्ता यादीवर हरकती, तक्रारी नोंदवणे तर १७ जुलैला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल, असे प्रवेशाचे वेळापत्रक आहे.

### अभियांत्रिकीसाठी ८ जुलैपर्यंत अर्ज करता येणार

१. अभियांत्रिकी (बीई, बीटेक) प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया नावनोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

२. त्यानुसार ८ जुलैपर्यंत विद्यार्थांना अर्ज करता येणार आहे.

पुण्य नगरी | ▪ बुधवार, २ जुलै २०२५

# 'वायसीएमयू'चा वर्धापन दिन उत्साहात

कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा वर्धापन दिन विभागीय कार्यालयाच्या आवारात उत्साहात झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण, महाराष्ट्र राज्य गीत आणि विद्यापीठ गीताचे सादरीकरण करण्यात आले. न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे स्वागत वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांनी केले. विविध अभ्यास केंद्रांचे प्रा. विश्वास पाटील, प्रा. राजू लोहार, प्रा. शंकर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विभाग केंद्रातील कक्ष अधिकारी संजय काटे, विवेक गुल्हाने, विजयसिंह रजपूत, सविता पाटील, निकिता देसाई, अमित व्हटकर, अक्षय नाईक, धीरज लोखंडे, प्रशांत केसरकर आदी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २ जुलै २०२५

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये जॉब ट्रेनिंग, फिल्ड प्रोजेक्ट उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर :** नवीन शैक्षणिक धोरणानुसार विवेकानंद महाविद्यालयाचा बायोटेक्नॉलॉजी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने बी. एस्सी. भाग ३ च्या विद्यार्थांसाठी जॉब ट्रेनिंग व फिल्ड प्रोजेक्ट हा उपक्रम घेण्यात आला. पृथ्वीराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पहिल्या दिवशी विविध औद्योगिक क्षेत्रामधून बाहेर पडणारे सांडपाणी, त्यावर करावी लागणारी प्रक्रिया व तपासणी यावर विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेत प्रात्यक्षिक केले. दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषद कार्यालय येथे बसवण्यात आलेल्या बायोगॅस प्लांटला भेट देत, जिथे कॅन्टिन किचनमधून तयार होणाऱ्या कचऱ्यापासून बायोगॅस तयार होतो याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी अनुभवले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. एस. जी. कुलकर्णी व डॉ. एस. बी. मुल्ला यांचे सहकार्य लाभले.

२४

# महिला सक्षमीकरणाची कोल्हापुरी मशाल : योगिता कोडोलीकर

## महिलांना आत्मनिर्भर करणारे 'प्रयोदी सोशल अँड कल्चरल फाउंडेशन'

प्रयोदी सोशल अँड कल्चरल फाउंडेशन

कोल्हापूरच्या मातीत अनेक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे जन्माला आली आहेत. स्वतःपलीकडे जाऊन, समाजाचा विचार करण्याची वृत्ती, हाच ज्यांचा स्थायीभाव आहे, असे एक नाव म्हणजे योगिता प्रवीण कोडोलीकर. महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या योगिताजी 'प्रयोदी सोशल अँड कल्चरल फाउंडेशन' द्वारे महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत.

### कौटुंबिक वारसा

योगिताजींचा प्रवास ग्रामीण भागातून सुरू झाला. डी. सी. नरके महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य वाय. सी. कांबळे आणि वत्सला कांबळे (कुडित्रे) यांच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण डी. सी. नरके हायस्कूलमध्ये आणि महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद महाविद्यालयात पूर्ण करून त्यांनी शिवाजी विद्यापीठातून एम.एस्सी. (संगणकशास्त्र) ही पदव्युत्तर पदवी संपादन केली. त्यानंतर त्या सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्याशी विवाहबद्ध होऊन शहरात आल्या. पती डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्याकडून सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन, महिलांसाठी काहीतरी भरीव कार्य करण्याची भावना योगिता यांच्या मनात रुजली आणि त्यातूनच 'प्रयोदी' संस्थेची संकल्पना साकार झाली. ग्रामीण तसेच शहरी भागातील संघर्षरत महिलांना त्यांनी मदतीचा हात दिला, ज्यामुळे त्यांची ग्रामीण भागाशी असलेली नाळ कधीच तुटली नाही.

महिला सक्षमीकरणाचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी २०१८ मध्ये योगिता यांनी 'प्रयोदी'ची स्थापना केली. फाऊंडेशनचे मुख्य उद्दिष्ट गृहिणी, नोकरदार, व्यावसायिक आणि लघुउद्योजक महिलांना एका व्यासपीठावर आणणे हे होते. या व्यासपीठावर त्यांच्या अनुभवांची देवाण-घेवाण होईल, एकमेकींना प्रेरणा मिळेल आणि व्यवसायाच्या नवनवीन संधी निर्माण होतील असे वातावरण योगिताजींनी निर्माण केले.

### समाजकार्याचे आयाम

कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या काळात जेव्हा माणूस माणसापासून दूर जात होता, तेव्हा योगिता आणि त्यांच्या 'प्रयोदी' संस्थेने समाजाप्रति आपले कर्तव्य बजावले. कितीतरी गरजू कुटुंबांना महिलांनी बनविलेले खाद्यपदार्थ आणि जेवणाचे डबे पुरवून मदतीचा हात दिला. यामुळे अनेक महिलांना रोजगार मिळाला. कोरोना काळात अनेकांचा रोजगार बुडाला असताना,



योगिता कोडोलीकर
संस्थापक-अध्यक्ष,
प्रयोदी सोशल अँड कल्चरल फाऊंडेशन, कोल्हापूर

महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देत श्वास अॅकॅडमी आणि 'प्रयोदी फाऊंडेशन' तर्फे एरोबिक्स, झुंबा आणि योगासने कार्यशाळेचे आयोजन केले जाते. लवकरच महिला आणि युवतींसाठी समुपदेशन केंद्र उभारण्याची त्यांची योजना आहे.



'प्रयोदी सोशल फाऊंडेशन'ने ८४५ कुटुंबांना दोन महिने पुरेल इतके जीवनावश्यक साहित्य, मदतस्वरूपात पुरविले. महापुराच्या काळातही त्यांनी पूरग्रस्त महिलांना साड्या वाटप आणि इतर साहित्य वाटपात पुढाकार घेतला. त्यांनी स्व-मालकीची बोअरवेल पाण्यासाठी उपलब्ध करून दिली. दऱ्याचे वडगाव येथील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी असलेल्या शाळेला पुस्तके देऊन त्यांनी शैक्षणिक मदतीचा हातही दिला. 'प्रयोदी'च्या माध्यमातून महिलांसाठी असलेल्या अनेक शासकीय योजनांची माहिती देणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि कायदेशीर बाबी समजावून सांगणे, हे कार्य अविरत सुरू आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण, कौशल्य विकास कार्यक्रम आणि बचत गटांची स्थापना करण्यासाठी त्यांचा प्रयत्न आहे. याव्यतिरिक्त, महिलांच्या आरोग्यासाठी आणि शिक्षणासाठी जागरूकता निर्माण करणे, तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून येथील महिला व मुलांचे प्रश्न सोडविण्यात त्यांचा नेहमी पुढाकार असतो. महिला सक्षणीकरणाला प्राधान्य देत असतानाच योगिताताई समाजातील तरुणाईप्रतिही तितक्याच संवेदनशील आहेत. 'प्रयोदी'च्या माध्यमातून तरुणाईसाठी अनेक उपक्रम त्या राबवितात. पारंपरिक हळदी-कुंकूसारख्या कार्यक्रमांमध्ये विधवा महिलांना निमंत्रित करून त्यांनी सामाजिक समरसतेचा संदेश दिला आहे. युवतींसाठी करिअर मार्गदर्शन आणि स्वसंरक्षण कार्यशाळा घेऊन त्या तरुण पिढीला सक्षम बनवीत आहेत. कायम खाकी युनिफॉर्ममध्ये असणाऱ्या महिला पोलिसांना थोडासा कामात विरंगुळा मिळावा, यासाठी त्या दर संक्रातीला त्या महिला पोलिसांसोबत हळदी-कुंकू कार्यक्रम घेऊन समाजात एक वेगळे उदाहरण आणि संदेश देतात.

### राजकारणात येण्याचा मानस

महिलांच्या हितासाठी आणि समाजाच्या विकासासाठी अधिक प्रभावीपणे काम करता यावे, यासाठी योगिता यांनी राजकारणात उतरण्याचा निर्धार केला आहे. राजकीय क्षेत्रातील संधीचा उपयोग त्या विचारेमाळ परिसराच्या विकासासाठी आणि महिलांच्या प्रगतीसाठी करणार असल्याचे त्या सांगतात. स्थानिक राजकारणात सक्रिय होऊन त्या महिलांचे प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे मांडून त्यांना आवश्यक त्या सुविधा मिळवून देऊ शकतील, असा त्यांना विश्वास आहे. या परिसरात हातावरचे पोट असलेली बहुतांश कुटुंबे राहतात. जगण्याशी लढाई सुरू असलेल्या कुटुंबांना सर्व सुखसोयी मिळाव्यात, यासाठी योगिता यांचा नेहमीच प्रयत्न असतो. त्यांच्या आजवरच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. यामध्ये मुक्ता फाऊंडेशनतर्फे महिला सन्मान पुरस्कार २०२३, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, हिल रायडर्स अॅडव्हेंचर फाऊंडेशन आणि कृष्णा फाऊंडेशनतर्फे मिळालेला कर्तृत्ववान महिला सन्मान यांचा समावेश आहे. नंदादीप प्रतिष्ठान, पुणे व प्रयोदी फाऊंडेशनच्या माध्यमातून कोल्हापुरातील महिलांना टू व्हीलर व फोर व्हीलर चालविण्याचे प्रशिक्षण मोफत देण्याचा त्यांचा मानस आहे.

सकाळ

कोल्हापूर, शनिवार, ५ जुलै २०२५

# फिटनेसच्या आवडीतून घडलेल्या उद्योजिका पल्लवी जाधव-माळी

## फिट राहण्याचा कानमंत्र देणारे कोल्हापुरातील 'ऐसफिट फिटनेस स्टुडिओ'

फिटनेस या तशा पुरुषी मक्तेदारी असणाऱ्या क्षेत्रात स्वतःच्या वेगळेपणातून पल्लवी जाधव-माळी यांनी फिटनेस ट्रेनर आणि त्याही पलीकडे जात स्वतःची जिम सुरू करून अनेकांना निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास बळ दिले. चार वर्षांपूर्वी चित्रनगरी शेजारी 'ऐसफिट फिटनेस स्टुडिओ' या नावाने जिमची सुरुवात केली. पण जिमकडे फक्त त्या व्यवसाय म्हणून पाहत नाहीत, तर लोकांना फिट राहण्याचा कानमंत्र देणारे फिटनेस मंदिर म्हणून पाहतात.

### फिटनेसची आवड

पल्लवी जाधव यांना लहानपणापासूनच फिटनेसची आवड होती. सहावी-सातवीत असल्यापासूनच त्या आपल्या वडिलांसोबत जिमला जायच्या. याच काळात त्यांची फिटनेसविषयीची रुची वाढत गेली. शाळेतील स्नेहसंमेलन असो वा खेळाचे सामने, त्या प्रत्येक उपक्रमात उत्साहाने भाग घेत असत. रोज एक ते दीड तास व्यायाम करणे, हा त्यांच्या दिनक्रमाचा भाग होता. पल्लवी यांना नृत्याचीही आवड होती. शालेय शिक्षण माईसाहेब बावडेकर शिक्षण संस्थेतून, तर विवेकानंद महाविद्यालयातून त्यांनी बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. नंतर पल्लवी यांनी एन्व्हायर्नमेंट इंजिनीअरिंगमध्ये केआयटीमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. मात्र लाखो रुपयांच्या पॅकेजची नोकरीची संधी असतानाही, त्यांनी आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकून फिटनेस क्षेत्रातच करिअर सुरू करण्याचा निश्चय केला. त्यांच्या या निर्णयाला त्यांच्या आई-वडिलांनी पूर्ण पाठिंबा दिला, हे विशेष.

### यास्मिन कराचीवाला यांच्याकडून प्रशिक्षण

जिममध्ये जाण्यामुळे त्यांना फिटनेसचे थोडे ज्ञान होते, पण या क्षेत्रात पूर्ण ज्ञान घेऊनच यायचे, या विचाराने त्यांनी आपले पुढील शिक्षण सुरू केले. पुण्यामधून त्यांनी बेसिक ट्रेनिंग व पर्सनल ट्रेनर हा कोर्स पूर्ण केला. यानंतर या क्षेत्रात आपली काहीतरी स्पेशालिटी असावी या उद्देशाने, त्यांनी मुंबई गाठली. तेथे त्यांनी थेरॉटिकल आणि प्रॅक्टिकल फिटनेसचे धडे गिरविले. विशेष म्हणजे, सेलिब्रिटींना फिटनेसचे धडे देणाऱ्या यास्मिन कराचीवाला यांच्याकडून त्यांनी प्रशिक्षण घेतले. करिना कपूर, बिपाशा बासू, कॅटरिना कैफ व आलिया भट्ट यांसारख्या दिग्गज अभिनेत्रींना यास्मिन कराचीवाला या फिटनेसचे धडे देतात. पिलाटे व फंक्शनल ट्रेनिंग या त्या वेळी नवीन असलेल्या व्यायामाचे प्रकार कसे शिकवायचे, याचीही त्यांनी अद्ययावत माहिती घेतली, ज्यामुळे त्या कोल्हापुरात हे प्रकार रुजविण्यासाठी सज्ज झाल्या.

### 'ऐसफिट फिटनेस स्टुडिओ'चा श्रीगणेशा

पल्लवी जाधव-माळी यांनी 'ऐसफिट फिटनेस स्टुडिओ'ची सुरूवात २७ जानेवारी २०२० रोजी केली. शरीरसौष्ठवमधील आयकॉन असलेल्या संग्राम चौगुले यांच्या हस्ते जिमचे उद्घाटन झाले. चित्रनगरीजवळ असलेली ही जिमची जागा शहराबाहेर आहे, त्यामुळे प्रतिसाद मिळेल की नाही, अशी चिंता त्यांना सुरुवातीला वाटली. तरीही त्यांनी धाडसाने या क्षेत्रात उडी घेतली आणि क्रॉसफिट, फंक्शनल ट्रेनिंग या नव्या व्यायामाच्या प्रकाराच्या बॅचेस घेऊन त्यामध्ये शिकविण्याच्या संकल्पनेला कोल्हापुरात पहिल्यांदाच सुरुवात केली. पहिले काही आठवडे मोफत फिटनेसचे धडे दिले. त्याच वेळी लोकांची व्यायामात रुची वाढावी, यासाठी त्यांनी स्पोर्ट्स स्पेसिफिक ट्रेनिंग, झुंबा व योगा हे व्यायामप्रकारही शिकविण्यास सुरुवात केली. त्यांच्या या दूरदृष्टीला आणि प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. सुरुवातीपासूनच त्यांच्या जिमला मोठा प्रतिसाद मिळू लागला. परदेशी बनावटीच्या अत्याधुनिक मशिनरीज त्यांनी व्यायामासाठी जिममध्ये उपलब्ध केल्या, त्यामुळे सदस्यांना उत्तम प्रशिक्षण अनुभव मिळाला. पुढे त्यांनी जून २०२४ मध्ये सदस्यांच्या वाढत्या प्रतिसादाचा विचार करून वेट ट्रेनिंग सेक्शनसुद्धा सुरू केले. त्याचे उद्घाटन खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते झाले. अशाप्रकारे त्यांनी टप्याटप्याने क्रॉसफिट, फंक्शनल ट्रेनिंग, कोर ट्रेनिंग, योगासने, झुंबा, स्पोर्ट स्पेसिफिक ट्रेनिंग व वेट ट्रेनिंग असे अनेक नवीन व्यायाम प्रकार आपल्या जिममध्ये शिकविण्यास सुरुवात केली. २०२० मध्ये कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत त्यांनी कोणताही मोबदला न घेता रोज ऑनलाईन फिटनेसचे धडे दिले. सध्याच्या परिसरातच त्यांचा जिम विस्तारण्याचा मानस आहे.



पल्लवी जाधव-माळी
संचालिका,
ऐसफिट फिटनेस स्टुडिओ






### विकासाची वाटचाल आणि दुहेरी जबाबदारी

पल्लवी जाधव यांचा विवाह फिटनेस प्रेमी असलेल्या प्रशांत माळी यांच्याशी झाला. प्रशांत यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ मसल ट्री जिम आहे. सध्या पल्लवी या घरच्या जबाबदारीसह या दोन्ही जिमचे व्यवस्थापन मोठ्या नेटाने आणि कौशल्यपूर्वक करीत आहेत. त्यांची ऊर्जा, समर्पण आणि फिटनेस क्षेत्रातील त्यांचे योगदान हे कोल्हापूरच्या अनेक तरुण - तरुणींसाठी प्रेरणादायी आहे. पल्लवी जाधव-माळी यांनी केवळ एक यशस्वी व्यवसायच उभा केला नाही, तर अनेकांना निरोगी आणि तंदुरुस्त जीवनशैलीकडे वळण्यास प्रोत्साहन दिले आहे.

### विविध उपक्रम

रोज एकाच प्रकारचा व्यायाम करून अनेकदा कंटाळा येऊ शकतो आणि त्याचा परिणाम शरीरावर होतो. व्यायामात सातत्य राखले तरच निरोगी आयुष्य जगता येते, हे त्यांनी जाणले होते. यासाठी आपल्या जिममध्ये येणाऱ्या प्रत्येकाचा उत्साह तोच टिकून राहावा, यासाठी त्या वर्षभर विविध उपक्रम राबवितात. जसे साऊंड मेडिटेशन, किक बॉक्सिंग, टर्फवर क्रिकेट व फुटबॉल, पावसाळ्यात ट्रेकिंग, तसेच वर्षभरात एखादी सहल आयोजित करणे. महिलांसाठी विशेष बॅच घेणे, महिला दिन, योगदिन, व्हॅलेंटाईन डे, वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रम राबवितात.

**आयुष्य एकदाचम मिळते. आपल्या फिटनेसची काळजी घ्या व ऐसफिट फिटनेस स्टुडिओला अवश्य भेट द्या.**

### ऐसफिट फिटनेस स्टुडिओ

आर. एस. नं. २०१, डी/३, सर्व्हे नं. १५७९, हायवे -चित्रनगरी रोड, चित्रनगरीजवळ, गोकुळ शिरगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर.

Pl 5/7/25

तरुण भारत संवाद

मंगळवार, ८ जुलै २०२५

# कुडित्रेत शेतकऱ्याची मुलगी झाली सीए

**वाकरे :** तिचे वडील शेतकरी... घरात शिक्षणाची फारशी मोठी परंपरा नाही... तरीही तिचे स्वप्न सी.ए. होण्याचे होते आणि हे स्वप्न तिने पूर्ण केले. प्राजक्ता आनंदा थोरुसे रा. कुडित्रे (ता.करवीर) असे या जिद्दी तरुणीचे नाव. गावातील पहिली सी.ए.होण्याचा मान तिने मिळवला. प्राजक्ता हिचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. दहावीपर्यंत शिक्षण श्रीराम हायस्कूल कुडित्रे येथे घेतले. अकरावी कॉमर्ससाठी विवेकानंद कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. याच कॉलेजमधून ती बारावी कॉमर्स परीक्षा उत्तीर्ण झाली. त्यानंतर बी.कॉम.आणि एम.कॉम.ची परीक्षा ती विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथून उत्तीर्ण झाली. विवेकानंद कॉलेजमध्ये शिकत असतानाच तिने सी.ए. ची इंटरमिजिएट परीक्षा दिली. कोरोनाचा काळ असल्यामुळे तिला या परीक्षेमध्ये दोन वेळा अपयश आले. मात्र तिसऱ्या वर्षी ती उत्तीर्ण झाली. ग्रामीण भागातील मराठी माध्यमाची मुले कोणत्याही परीक्षेत यशस्वी होतात हे प्राजक्ताने दाखवून दिले आहे. तिच्या या वाटचालीत वडील आनंदा आणि आई जयश्री यांचे मार्गदर्शन लाभले.



▪ प्राजक्ता थोरुसे बनली गावातील पहिली सी.ए.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ८ जुलै २०२५

# 'विवेकानंद'मध्ये इको क्लबची स्थापना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत सरकारच्या शिक्षण विभागामार्फत इको क्लब फॉर मिशन लाईफ या अभियानांतर्गत विवेकानंद महाविद्यालयामध्ये इको क्लबची स्थापना करण्यात आली आहे.

इको क्लबच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या शासनाच्या उपक्रमांतर्गत वन महोत्सवानिमित २५ रोपांचे वितरण विद्यार्थ्यांना करण्यात आले. समितीमध्ये इको क्लबचे प्रमुख म्हणून प्रा. एच. जी. पाटील हे काम पाहणार आहेत. सदस्य म्हणून २४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

.२५

पुण्यनगरी | मंगळवार, ८ जुलै २०२५

# विवेकानंदमध्ये 'इको क्लब'ची स्थापना

**कोल्हापूर :** भारत सरकारच्या शिक्षण विभागामार्फत इको क्लब फॉर मिशन लाईफ या अभियानांतर्गत विवेकानंद ज्युनिअर कॉलेजमध्ये इको क्लबची स्थापना करण्यात आली. या समितीमध्ये इको क्लबचे प्रमुख म्हणून प्रा. एच. जी. पाटील हे काम पाहणार असून, सदस्य म्हणून २४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

इको क्लबतर्फे 'एक पेड माँ के नाम' या शासनाच्या उपक्रमांतर्गत वन महोत्सवानिमित विद्यार्थ्यांना २५ रोपांचे वितरण करून रोप लावतानाचा आपल्या आईसोबतचा सेल्फी पाठवण्याचे आवाहन केले आहे. सेल्फी पाठवल्यानंतर विद्यार्थ्यांना डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. हा उपक्रम सर्व विद्यार्थ्यांकडून राबवण्यात येणार आहे.

क्लबची स्थापना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी एस. पी. थोरात, शिल्पा भोसले, एम. आर. नवले, एस. टी. शिंदे, बी. एस. कोळी, गीतांजली साळुंखे, पर्यावरण विभागप्रमुख हेमंत पाटील, डॉ. अभिजित पाटील, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

8.7.25

तरुण भारत संवाद
शनिवार, १२ जुलै २०२५

# विवेकानंद महाविद्यालयात ई पोस्टर स्पर्धेचे आयोजन

**कोल्हापूर :** विवेकानंदमधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त ई–पोस्टर स्पर्धेचे आयोजन केले होते. बीए., बीकॉम.च्या विद्यार्थ्यांनी लोकसंख्येच्या प्रश्नावर मांडणी केली. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. कैलास पाटील म्हणाले, युवकांमध्ये लोकसंख्यावाढीची समस्या, दुष्परिणाम व उपाययोजनांविषयी जागरूकता केली पाहिजे. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी प्रास्ताविक केले. परीक्षक म्हणून सई पाटील, डॉ. सोमनाथ काळे यांनी काम पाहिले. आभार आश्विनी गीते यांनी मानले. सूत्रसंचालन खतिजा किल्लेदार यांनी केले. यावेळी डॉ. संदीप पाटील, विद्यार्थी, उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १२ जुलै २०२५

# विवेकानंद महाविद्यालयातील ई-पोस्टर स्पर्धेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त ई-पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत बी.ए. व बी.कॉम. शाखेतील विद्यार्थ्यांनी लोकसंख्येच्या प्रश्नावर अभ्यासपूर्ण मांडणी करून वाढीचा समाजावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकणारे पोस्टर्स सादर केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कैलास पाटील यांनी युवकांमध्ये लोकसंख्यावाढीची समस्या, तिचे दुष्परिणाम व उपाययोजनांविषयी जागरूकता निर्माण करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख परीक्षक म्हणून सई पाटील (गृहविज्ञान विभाग) व डॉ. सोमनाथ काळे यांनी ई-पोस्टर्सचे मूल्यमापन व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. खतिजा किल्लेदार यांनी सूत्रसंचालन केले. आश्विनी गीते यांनी आभार मानले.

पुढारी शहर-जिल्हा कोल्हापूर, रविवार, १३ जुलै २०२५

# 'ए. आय.' तंत्रज्ञान शिकण्याची सुवर्णसंधी

## पश्चिम महाराष्ट्रात चार शहरांत कार्यशाळा; दै. 'पुढारी' - 'अ कन्सल्टन्सी'तर्फे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भविष्यातील वेगाने बदलणारे जग कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित असणार आहे. या नव्या युगात स्वतःला अपडेट ठेवून यशस्वी वाटचाल करण्यासाठी एक सुवर्णसंधी दै. 'पुढारी' आणि 'अ कन्सल्टन्सी' यांनी उपलब्ध करून दिली आहे. पुणे येथील कार्यशाळांच्या प्रचंड यशानंतर, आता कोल्हापूर, सांगली, कराड आणि सातारा येथे 'बेसिक्स ऑफ ए. आय. अँड ए. आय. टूल्स' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

**मोजक्याच जागा शिल्लक**

या कार्यशाळेत ए.आय. तंत्रज्ञानाची क्लिष्ट माहिती सोप्या आणि सहज समजेल अशा भाषेत दिली जाणार आहे. विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी, फ्रीलान्सर अशा कोणत्याही वयोगटातील आणि शैक्षणिक पार्श्वभूमीची व्यक्ती यात सहभागी होऊ शकते.

**काय शिकणार कार्यशाळेत?**

ए.आय. आणि चॅट जीपीटीचा दैनंदिन जीवनात आणि व्यवसायात प्रभावी वापर कसा करावा, यावर भर दिला जाईल. सहभागींना प्रेझेंटेशन, वेबसाईट, व्हिडीओ निर्मिती, सोशल मीडिया पोस्ट, लोगो डिझाईन आणि कन्टेन्ट रायटिंगसाठी उपयुक्त ठरणाऱ्या २० हून अधिक ए.आय. टूल्सचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण मिळेल.

**पुढारी**

### कार्यशाळेचे वेळापत्रक

- **कोल्हापूर :** दिनांक : १८ जुलै २०२५
  **स्थळ :** स्वामी विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क
- **सांगली :** दिनांक : १९ जुलै २०२५
  **स्थळ :** गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स
- **कराड :** दिनांक : २० जुलै २०२५
  **स्थळ :** लिगाडे पाटील ज्युनिअर कॉलेज, विद्यानगर
- **सातारा :** दिनांक : २१ जुलै २०२५
  **स्थळ :** कला व वाणिज्य महाविद्यालय, शुक्रवार पेठ

या कार्यशाळेत ए.आय. आणि मार्केटिंग सल्लागार डॉ. अमेय पांगारकर व प्रॉम्प्ट इंजिनिअर प्रसाद कुलकर्णी हे मार्गदर्शन करतील. सोबतच, ए.आय. तज्ज्ञ डॉ. भूषण केळकर भविष्यातील करिअर संधींवर, तर मानसशास्त्रज्ञ डॉ. मधुरा केळकर या तंत्रज्ञानाच्या मानसिक पैलूंवर प्रकाश टाकतील.

ही कार्यशाळा सशुल्क असून त्यासाठी २५०० इतके शुल्क आकारण्यात येणार आहे. या कार्यशाळेसाठी जागा मर्यादित असून ग्रुप बुकिंगवर विशेष सवलत देण्यात येणार आहे. ही कार्यशाळा सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. सहभागींना 'ए.आय.च्या बटव्यातून' आणि 'इंडस्ट्री ४.०' ही बेस्टसेलर पुस्तके, दुपारचे जेवण, चहा-नाश्ता आणि सहभागाचे प्रमाणपत्र दिले जाईल. जागा मर्यादित असल्याने इच्छुकांनी आपला प्रवेश लवकरात लवकर निश्चित करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**अधिक माहिती व नावनोंदणीसाठी :**

**तन्वी आंबेरकर :** ७७५८९४५३२४

**रोहित जोशी :** ९८३४४३३२७४

पुण्य नगरी ■ रविवार, १३ जुलै २०२५

# 'विवेकानंद'मध्ये ई-पोस्टर स्पर्धेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त ई-पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत बी.ए. आणि बी.कॉम. शाखेतील विद्यार्थ्यांनी लोकसंख्येच्या प्रश्नावर अभ्यासपूर्ण मांडणी करून त्याचा समाजावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकणारे पोस्टर्स सादर केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कैलास पाटील होते. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख परीक्षक म्हणून सई पाटील, डॉ. सोमनाथ काळे यांनी काम पाहिले. आभार आश्विनी गीते यांनी मानले. सूत्रसंचालन खतिजा किल्लेदार यांनी केले. याप्रसंगी डॉ. संदीप पाटील यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

7/25

7/2025

। बुधवार दि. १६ जुलै २०२५ । वर्ष -१३ । मुंबई

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत | अंक

Follow Us on Social Media

www.theglobaltimes.org

EPaper

द ग्लोबल टाइम्स

मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHMAR /2012/44621

# विवेक वाहिनी ही समाजाला प्रगल्भ करणारी चळवळ : प्रा. हिर्डेकर



**माणगाव** : विद्यार्थ्यांमध्ये मानवता धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विवेक वाहिनीचे योगदान मोठे आहे. विवेक वाहिनीच्याद्वारे आयोजित केलेल्या व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य, शिबिरे, पर्यावरण, संविधान प्रबोधन, नेतृत्व विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करणे आवश्यक आहे. विवेक वाहिनी ही समाजाला प्रगल्भ करणारी चळवळ असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूरचे जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. टी. एम. हिर्डेकर यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेजमधील विवेक वाहिनी विभाग, आयक्यूएसी विभाग आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेत बोलत होते. या कार्यशाळेचे उद्घाटन अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी विवेक वाहिनी चळवळीतून धगधगते विद्यार्थी घडविणे गरजेचे आहे. विविध कल्पना व योजना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी विवेक वाहिनी मदत करीत असते. विवेक वाहिनीच्या माध्यमातून तरुणांनी स्वतःमध्ये विचार करण्याची क्षमता वृद्धिंगत केली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात कृष्णात स्वाती यांच्या मार्गदर्शनाखाली गटचर्चा घेण्यात आली. दुसऱ्या सत्रात विभावरी नकाते आणि डॉ. संतोष जेठीथोर यांनी 'विवेक वाहिनी का व कशी' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थना व रोपट्याला पाणी घालून करण्यात आली. प्रास्ताविक अंनिस कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रविण चौगुले यांनी केले. आभार अंनिसचे राज्य सचिटणीस कृष्णात स्वाती यांनी मानले तर सूत्रसंचालन रेश्मा खाडे यांनी केले.

कार्यशाळेचे संयोजन डॉ. सरिता शिंदे यांनी केले. या कार्यशाळेस आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रमोद शिंदे, डॉ. संदीप पाटील, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि विविध महाविद्यालयातील विवेक वाहिनी विभागाचे समन्वयक उपस्थित होते.

# कंपनी सेक्रेटरी हा करिअरसाठीचा राजमार्ग : जयदीप पाटील

**कोल्हापूर :** आजच्या युगात कंपनी सेक्रेटरी हे करिअरसाठी एक उत्तम क्षेत्र आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या मेहनतीने अभ्यास केला आणि परीक्षा पास झाल्या तर चांगल्या कंपनीमध्ये उच्च दर्जाच्या नोकरीच्या संधी मिळतील, असे मत 'आयसीएसआय'चे चेअरमन जयदीप पाटील यांनी व्यक्त केले.

विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित कंपनी सेक्रेटरी करिअर व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

पाटील म्हणाले, कला, वाणिज्य, विज्ञान या कोणत्याही शाखेतील विद्यार्थी कंपनी सेक्रेटरी पदवी प्राप्त करू शकतो. कायदेशीर सल्लागार, मानव संसाधन प्रबंधक, व्यवसाय अनुपालन नियंत्रण, संतुलन ठेवण्याचे काम कौशल्य उत्कृष्ट कंपनी सेक्रेटरीचे आहे. आजच्या कार्पोरेट जगामध्ये प्रशासक म्हणून त्याची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. प्रा. शिल्पा भोसले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. एन. ढगे यांनी स्वागत केले. प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. अश्विनी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. बी. एस. कोळी यांनी आभार मानले.

16/7/25

तरुण भारत बुधवार १६ जुलै २०२५

# प्रा. डॉ. एम. जी. पाटील सेवानिवृत्तीनंतर झाले एम. ए.

**हुपरी :** शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.शिक्षण घेण्यासाठी वयाची अट नसते. हे प्रत्यक्षात दाखवून दिले आहे. रेंदाळ येथील प्रा. डॉ. एम. जी. पाटील यांनी. डॉ. पाटील यांचा



जन्म शेतकरी कुटुंबात झाला. घरात पूर्वीपासून शिक्षणाची परंपरा नव्हती. त्यांनी निश्चय करून प्राथमिक शिक्षण रेंदाळमध्ये माध्यमिक शिक्षण हुपरी येथील रयत शिक्षण संस्थेत पूर्ण केले. त्यानंतर कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज मध्ये बी. एस. सी. पदवी घेऊन पुढे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे फिजिक्स डिपार्टमेंटमध्ये एम. एस. सी. पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झालेनंतर पदार्थ विज्ञानामध्ये शिक्षण घेतल्यानंतर विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये व वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी केली. नोकरी करत असताना यु. जी. सी. च्या फेनोथिपमध्ये एम. फील पूर्ण करून १९९४ ला पी. एचडी प्राप्त केली. ३४ वर्षानंतर सेवानिवृत्त झाले. २०२३ मध्ये रुकडी कॉलेजमध्ये एम. ए. अर्थशास्त्र विषयासाठी रेग्युलर प्रवेश घेतला. दररोज चार तास अभ्यास करून ही पदवी प्राप्त केली.

# दैनिक 'पुढारी' व 'अ कन्सल्टन्सी'तर्फे कोल्हापुरात आज ए.आय. कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भविष्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता युग आत्मसात करण्याची सुवर्णसंधी आज कोल्हापूरकरांना मिळणार आहे. दै. 'पुढारी' आणि 'अ कन्सल्टन्सी' यांच्या संयुक्त विद्यमाने 'बेसिक्स ऑफ ए.आय. अँड ए.आय. टूल्स' ही एकदिवसीय कार्यशाळा शुक्रवारी (दि. १८) ताराबाई पार्कातील स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. अमेय पांगारकर आणि प्रसाद कुलकर्णी हे चॅट जीपीटीसह प्रेझेंटेशन, वेबसाईट, व्हिडीओ निर्मिती आणि कंटेंट रायटिंगसाठी उपयुक्त २० हून अधिक ए.आय. टूल्सचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देणार आहेत. विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी अशा सर्वांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. या कार्यशाळा सशुल्क असून, याला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणाऱ्या या कार्यशाळेतून बदलत्या तंत्रज्ञानासोबत स्वतःला अपडेट ठेवण्याची उत्तम संधी मिळणार आहे. ही कार्यशाळा सांगली, सातारा, कराड येथेदेखील होणार आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी तन्वी आंबेरकर ७७५८९४५३२४, रोहित जोशी ९८३४४३३२७४ यांच्याशी संपर्क साधावा.

पुढारी कोल्हापूर शुक्रवार, १८ जुलै २०२५

# खेळाडू जन्मतारखेत फेरफार केल्यास कठोर कारवाई

## क्रीडा उपसंचालक सुहास पाटील : मनपास्तर शालेय क्रीडा स्पर्धा नियोजन बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जन्मतारखेत फेरफार करून अधिक वयाचे खेळाडू खेळविल्यास तसेच स्पर्धा संयोजनात अडथळा निर्माण करणे, खोटी माहिती देणे या बाबी निदर्शनास आल्यास गंभीर दखल घेऊन कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा देत नियम व अटींचे काटेकोर पालन करून आणि खिलाडू वृत्ती जपत शालेय क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्याचे आवाहन क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांनी केले.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील कोल्हापूर मनपास्तर शासकीय शालेय क्रीडा स्पर्धांची नियोजन सभा गुरुवारी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या ग्रंथालय हॉलमध्ये झाली. कोल्हापूर महानगरपालिका शिक्षण मंडळ व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित नियोजन सभेत पाटील यांनी मार्गदर्शन केले.



**कोल्हापूर : क्रीडा स्पर्धेच्या नियोजन सभेचा प्रारंभ करताना विभागीय उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस, डी. सी. कुंभार, बाळासाहेब कांबळे, सचिन पांडव, सुधाकर जमादार, महेश कदम आदी.**

### पंच व खेळ अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील

जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांनी स्पर्धेसाठीच्या नियमांची माहिती दिली. यात स्पर्धा प्रवेशिका मुदतीत भरावी, लॉटस् देलेल्या वेळेत शाळेच्या शिक्षकांच्या उपस्थितीतच पडतील. नियोजित वेळेपूर्वी क्रीडा शिक्षक व खेळाडूंनी रिपोर्टिंग करावे. खेळाडूंच्या वयाचा दाखला, शाळा रजिस्टर साक्षांकित प्रत, ऑनलाईन प्रवेशिका, ओळखपत्र, जन्म दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट आदी कागदपत्रे बंधनकारक आहेत.

प्रवेशिकेवर ज्या क्रीडा शिक्षकांचे नाव आहे त्यांची उपस्थिती अनिवार्य असेल. खेळाडूंना स्पोर्टस् किट सक्तीचे असेल. १४ वर्षाखालील खेळाडूंना शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक. परराज्यातील खेळाडूंच्या कागपत्रांची कठोर तपासणी, उत्तेजक द्रवांचा वापरावर बंदी, स्पर्धेच्या ठिकाणी अस्वच्छता, शांतता भंग होणार नाही याची काळजी क्रीडा शिक्षकांनी घ्यावी. राष्ट्रीय स्पर्धेकरिता पात्र खेळाडूंची वय पडताळणी चाचणी शाळांना अनिवार्य असेल.

पंच व सबंधित खेळ अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील. संघटनात्मक व वैयक्तिक वाद करू नयेत. कोणत्याही कारणास्तव खेळाडूस दुखापत झाल्यास संयोजन समिती जबाबदार राहणार नाही. प्रथमोपचार देण्यात येतील. स्पर्धा कालावधीत विद्यार्थ्यांचा अपघात अथवा दुखापत झाल्यास राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत कार्यवाही होईल आदी गोष्टींचा समावेश होता. सहविचार सभेत क्रीडा शिक्षक यांनी ऑनलाईन प्रवेशिका, प्रमाणपत्र, सलंग्नता फी, शहराच्या फुटबॉल / क्रिकेट स्पर्धा अन्य ठिकाणी न घेता विभागीय क्रीडा संकूल अथवा छ. शिवाजी स्टेडियम येथे घेण्यात याव्यात, अशी सूचना केली.

सभेला तालुका क्रीडा अधिकारी सुधाकर जमादार, बाळासाहेब कांबळे, क्रीडा मार्गदर्शक सीमा पाटील, रविभूषण कुमठेकर, अनिकेत बोडके, क्रीडा कार्यकारी अधिकारी सोनल सावंत, क्रीडा विकास अधिकारी अजिंक्य चौगुले, प्रा. महेश कदम, प्रा. समीर पठान, प्रा. प्रशांत कांबळे, संदीप जाधव उपस्थित होते. प्रास्ताविक प्रशासनाधिकारी प्राथमिक शिक्षण समिती डी. सी. कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी, स्वागत डॉ. विकास जाधव यांनी आणि आभार प्रदर्शन मनपा क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांनी केले.

सकाळ TODAY

कोल्हापूर, शुक्रवार, १८ जुलै २०२५

# खोटी माहिती दिल्यास गंभीर दखल

## क्रीडा उपसंचालक; शालेय क्रीडा स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर बैठक

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १७ : जन्मतारखेत फेरफार करून अधिक वयाचे खेळाडू खेळविल्यास, स्पर्धा संयोजनात अडथळा आणल्यास, खोटी माहिती देण्यासारख्या बाबी निदर्शनास आल्यास गंभीर दखल घेण्यात येईल, असे क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांनी सांगितले.**




कोल्हापूर : महानगरपालिकास्तर शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी शहरातील क्रीडा शिक्षकांच्या सहविचार सभेत बोलताना उपसंचालक सुहास पाटील. सोबत अन्य अधिकारी.

महानगरपालिकास्तर शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी विवेकानंद महाविद्यालयामध्ये शहरातील सर्व क्रीडा शिक्षकांची सहविचार सभा झाली. महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, विवेकानंद महाविद्यालय यांच्या सहकार्याने ही सभा झाली.

उपसंचालक पाटील म्हणाले, 'क्रीडा शिक्षक व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शालेय जीवनातील स्पर्धा महत्त्वपूर्ण असतात. स्पर्धा संयोजन नेटके व खिलाडूवृत्तीने झाले पाहिजे. शाळा व शिक्षकांनी मुदतीत प्रवेश नोंदविणे, क्रीडा प्रवेशिका देणे, पंच परीक्षा, क्रीडा कार्यशाळेत सहभागी होऊन शिक्षकांनी ज्ञान वाढवले पाहिजे. तक्रार समिती व स्पर्धा आयोजन समिती गठीत करून स्पर्धा घ्या. शिल्लक व चालू प्रमाणपत्राचे योग्य वितरण करावे.'

जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांनी, स्पर्धा प्रवेशिका मुदतीत सादर करा. नंतर मुदत वाढवून दिली जाणार नाही. स्पर्धेची तसेच इतर माहिती सांगितली. १४ वर्षांखालील खेळाडूस स्पर्धा सहभागासाठी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. परराज्यातील खेळाडूंच्या कागपत्रांची योग्य तपासणी करण्यात येईल. उत्तेजक द्रवांचा वापर करण्यात येऊ नये. संघटनात्मक व वैयक्तिक वाद नकोत. शहराच्या फुटबॉल, क्रिकेट स्पर्धा अन्य ठिकाणी न घेता विभागीय क्रीडा संकुल वा छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे घेण्यात याव्यात. राहण्याची सुविधा, तक्रार निवारण समितीबाबत त्यांनी मत व्यक्त केले.

प्राथमिक शिक्षण समितीचे प्रशासनाधिकारी डी. सी. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संतोष कुंडले यांनी स्वागत केले. विवेकानंद कॉलेजचे जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी पुस्तक दिले. क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांनी आभार मानले. तालुका क्रीडा अधिकारी सुधाकर जमादार, बाळासाहेब कांबळे, सीमा पाटील, रविभूषण कुमठेकर, अनिकेत बोडके, सोनल सावंत, अजिंक्य चौगुले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, संदीप जाधव उपस्थित होते.

### स्पर्धेसाठी सूचना

- जन्मदाखला, पहिलीतील शाळा रजिस्ट्रची साक्षांकित प्रत, 
- ऑनलाईन प्रवेशिका, ओळखपत्र, आधार कार्ड/पासपोर्ट आवश्यक
- प्रवेशिकेवर नाव असणाऱ्या क्रीडा शिक्षकांची उपस्थिती अनिवार्य
- राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र खेळाडूंची वय चाचणी संबंधित शाळांनी करणे अनिवार्य
- पंच, संबंधित खेळ अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल
- स्पर्धेदरम्यान दुखापत, दुर्घटना झाल्यास संयोजन समिती जबाबदार नाही
- राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून कार्यवाही

सकाळ

कोल्हापूर, सोमवार, २१ जुलै २०२५

# विद्यापीठाच्या अधिकारमंडळांवर अकरा जणांची निवड

## डॉ. आर. आर. कुंभार, अभिजित कापसे, पृथ्वीराज पाटील यांचा समावेश

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट (अधिसभा), स्थायी समिती, अभ्यास मंडळ या अधिकार मंडळांवर अकरा जणांची निवड झाली आहे. त्यात विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजित कापसे, व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज पाटील आदींचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या स्थायी समितीची बैठक नऊ जुलै रोजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यात अधिसभेवर दोन आणि इतर अधिकार मंडळावर तेरा जणांची निवड करण्याचा निर्णय झाला. यावेळी स्थायी समितीचे सदस्य



कुलसचिव व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता एम. एस. देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य सर्जेराव पाटील, ॲड. अजित पाटील, प्रा. डॉ. रघुनाथ पाटील उपस्थित होते.

या बैठकीतील निर्णयानुसार प्राचार्य प्रतिनिधी गटातून प्राचार्य डॉ. कुंभार आणि संस्थाचालक प्रतिनिधी गटातून ॲड. कापसे यांची अधिसभा सदस्यपदी निवड झाली.



डॉ. आर. आर. कुंभार



ॲड. अभिजीत कापसे



पृथ्वीराज पाटील

व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली. कॉम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर प्रा. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर प्रा. एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज, हातकणंगले), भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. मीना पोतदार (भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. आर. पी. पाटील (म. ह. शिंदे कॉलेज, तिसंगी), मायक्रोबॉयलॉजी अभ्यास मंडळावर प्रा. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज, हातकणंगले), अर्थशास्त्र विषय अभ्यास मंडळावर डॉ. संतोष बराले (हुपरी कॉलेज) आणि इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी प्रा. एम. के. भानारकर यांची निवड झाली.

लोकमत सोमवार, दि. २१ जुलै २०२५

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर कुंभार, कापसे यांची निवड

## व्यवस्थापन परिषदेचे सदस्य पृथ्वीराज पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क



डॉ. आर. आर. कुंभार

कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठ अधिसभा (सिनेट) सदस्य म्हणून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजित कापसे यांची निवड करण्यात आली. नऊ जणांची विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवर निवड झाली.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या स्थायी समितीची बैठक झाली होती. बैठकीत 'सिनेट'वर दोघे व अन्य अधिकार मंडळावर १३ जणांच्या समावेशचा निर्णय झाला होता.

दरम्यान, नियुक्त सदस्यांना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे याच्या स्वाक्षरीने पत्रे देण्यात आली. प्राचार्य प्रतिनिधी गटातून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. कुंभार व संस्थाचालक प्रतिनिधी गटातून ॲड. कापसे यांची



ॲड. अभिजित कापसे



पृथ्वीराज संजय पाटील

सिनेट सदस्य म्हणून नियुक्ती झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज संजय पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली.

इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी प्रा. डॉ. भानारकर यांची निवड झाली. कॉम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर प्रा. एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज, हातकणंगले), भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. मीना पोतदार (भूगोल विभाग), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. आर. पी. पाटील (म. ह. शिंदे कॉलेज, तिसंगी), मायक्रोबॉयोलॉजी अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज, हातकणंगले), यांची निवड करण्यात आली.

तरुण भारत संवाद
सोमवार, २१ जुलै २०२५

# विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर १५ जणांची नियुक्ती

- अधिसभा सदस्यपदी डॉ. आर. आर. कुंभार, ॲड अभिजित कापसे, स्थायी समितीवर पृथवीराज पाटील





आर. आर. कुंभार | अभिजित कापसे | पृथ्वीराज पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यपदी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजीत कापसे यांची निवड करण्यात आली. व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली. याशिवाय आठजणांची विविध अधिकार मंडळावर निवड केली आहे.

प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या स्थायी समितीची बैठक झाली. बैठकीत अधिसभा सदस्य म्हणून दोन व अन्य अधिकार मंडळावर तेरा जणांची निवड केली आहे. दरम्यान, या सदस्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. १३ पैकी ११ जणांची नियुक्ती केल्यासंदर्भातील माहिती संबंधितांना ई–मेलद्वारे पाठविली आहे. नियुक्त सदस्यांना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे याच्या स्वाक्षरीने पत्रे पाठवली. प्राचार्य प्रतिनिधी गटातून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. कुंभार व संस्थाचालक प्रतिनिधी गटातून ॲड. कापसे यांची सिनेट सदस्य म्हणून नियुक्ती झाली. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी डॉ. एम. के. भानारकर यांची निवड झाली. कम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर डॉ. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज हातकणंगले), भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर डॉ. मीना पोतदार (भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ ), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर डॉ. आर. पी. पाटील (म.ह.शिंदे कॉलेज तिसंगी), मायक्रोबॉयलॉजी अभ्यास मंडळावर डॉ. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी विषयाच्या अभ्यास मंडळावर डॉ. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज हातकणंगले), अर्थशास्त्र विषय अभ्यास मंडळावर डॉ. संतोष बराले (हुपरी कॉलेज) यांची निवड करण्यात आली.

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर प्राचार्य कुंभार, ॲड. कापसे

## पृथ्वीराज पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती



आर. आर. कुंभार



अभिजित कापसे



पृथ्वीराज पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) सदस्य म्हणून विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. अभिजित कापसे यांची निवड करण्यात आली. याशिवाय ९ जणांची विविध अधिकार मंडळावर निवड झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य पृथ्वीराज संजय पाटील यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती झाली

इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी प्रा. डॉ. भानारकर यांची निवड झाली. कॉम्प्युटर सायन्स अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. सचिन पाटील (इस्लामपूर), स्थापत्य विषय अभ्यास मंडळावर प्रा. एस. बी. हिरवेकर (डांगे कॉलेज, हातकणंगले), भूगोल विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. मीना पोतदार (भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ), रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. आर. पी. पाटील (म. ह. शिंदे कॉलेज, तिसंगी), मायक्रोबॉयोलॉजी अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. विनयकुमार सुतार (नाईक कॉलेज, चिखली), मराठी विषयाच्या अभ्यास मंडळावर प्रा. डॉ. एकनाथ पाटील (डांगे कॉलेज, हातकणंगले), अर्थशास्त्र विषय अभ्यास मंडळावर डॉ. संतोष बराले (हुपरी कॉलेज) यांची निवड झाली.

पुण्य नगरी ▌ मंगळवार, २२ जुलै २०२५

# 'विवेकानंद'मध्ये बँक राष्ट्रीयीकरण दिन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये ५६ वा बँक राष्ट्रीयीकरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे सॅटर्डे व्हील उपक्रमांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात शुभम साबळे यांनी प्रस्तावना करून केली. बँकांच्या लोगोचे अर्थ व त्यामागील संकल्पना, याबाबत रोशन खवरे यांनी अत्यंत रंजक पद्धतीने माहिती दिली. कार्यक्रमात वैष्णवी सावंत यांनी राष्ट्रीयीकृत बँकांचे घोषवाक्य मनोरंजक पद्धतीने सादर केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कैलास पाटील यांनी बँक राष्ट्रीयीकरणाचा इतिहास, त्यामागील गरज व महत्त्व, तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी घेतलेला निर्णय आणि यातून घडलेले वित्तीय समावेशन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन खतीजा किल्लेदार यांनी केले, तर आभार यश पाटील यांनी मानले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. संपदा ठिपकुर्ले, डॉ. संदीप पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# 'विवेकानंद'मध्ये बँक राष्ट्रीयीकरण दिन साजरा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सॅटर डे व्हील उपक्रमांतर्गत ५६ वा बँक राष्ट्रीयीकरण दिन साजरा करण्यात आला. बँकांचे विविध लोगोंचे अर्थ व त्यामागील संकल्पना रोशन खवरे यांनी सांगितल्या. कार्यक्रमात वैष्णवी सावंत यांनी राष्ट्रीयीकृत बँकांचे स्लोगन्सचे, घोषवाक्य सांगितली. अध्यक्षीय भाषणात डॉ. कैलास पाटील यांनी बँक राष्ट्रीयीकरणाचा इतिहास, त्यामागील गरज व महत्त्व विशद केले. शुभम साबळे यांनी प्रास्ताविक केले. खतीजा किल्लेदार यांनी सूत्रसंचालन केले. यश पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. ए. बी. वसेकर, डॉ. संपदा टिपकुर्ले, डॉ. संदीप पाटील आदी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश कबनूकरचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बंगळूर येथील सेंट फ्रान्सिस डे सेल्स कॉलेज येथे दुसरी ट्रिपल क्राऊन चेस २०२५ स्पर्धा झाली. या स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूकर याने स्पर्धेत प्राविण्य मिळविले. त्याला रोख रक्कम, पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. ब्लीट्झ स्पर्धेमध्ये १६० गुणांची कमाई त्याने केली.

ऋषीकेश याने ब्लीट्झ स्पर्धेत गोव्यातील चॅम्पियन बुद्धिबळ खेळाडू मंदार लाड याचा पराभव केला. त्याने साडेसात गुणांची कमाई करून चौथा क्रमांक मिळविला. रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत त्याने सात गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा तो विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. विकास जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद

गुरुवार, २४ जुलै २०२५

# विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केल्या राख्या

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील गृहविज्ञान विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राखी तयार करणे कार्यशाळा घेतली. रेखा मलाबादे यांनी विविध प्रकारच्या राख्या बनविण्याची प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवली. विद्यार्थ्यांनी क्रिस्टल राखी, लोकरी फुलांची राखी, नथ फुल राखी अशा अनेक प्रकारच्या राख्या तयार केल्या. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. श्रुती जोशी यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. स्वागत विभाग प्रमुख डॉ. उर्मिला खोत यांनी केले. आभार योगिता पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन सई पाटील यांनी केले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक उपस्थित होते.

तरुण भारत
गुरुवार, २४ जुलै २०२५

# आजऱ्याचे धनाजी देसाई एन.सी.सी. ट्रेनिंग ऑफिसर

प्रतिनिधी
आजरा

आजऱ्याचे सुपुत्र लेफ्टनंट कर्नल धनाजी चंद्रकांत देसाई यांची एन.सी.सी. ग्रुप हेड क्वॉटर कोल्हापूरच्या ट्रेनिंग ऑफिसरपदी नियुक्ती झाली आहे. लेफ्टनंट कर्नल देसाई यांच्या रूपाने आजरा तालुक्याला प्रथमच ही संधी प्राप्त झाली आहे. गेली १९ वर्षे त्यांनी भारतीय सैन्य दलात मराठा लाईट इन्फंट्रीचे ऑफिसर म्हणून काम पाहिले आहे.



देसाई यांनी सैन्यदलात जाऊ इच्छिणाऱ्या तरूणाईसमोर आदर्श ठेवला आहे. येथील व्यंकटराव हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेत असताना एन.सी.सी.जॉईन केली.याठिकाणी एन.सी.सी.चे 'ए' सर्टीफिकेट प्राप्त केले. येथील आजरा महाविद्यालयात ११ वी व १२ वीचे शिक्षण पूर्ण केले. तर कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये पदवीचे शिक्षण घेत असताना एन. सी. सी. चे 'सी' सर्टीफिकेट प्राप्त केले. सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिलेल्या देसाई यांनी एन.सी.सी.च्या माध्यमातून बेस पक्का केला, आणि सैन्यदलात अधिकारी होण्याच्या दृष्टीने तयारी सुरू केली.

सैन्यातील अधिकारी पदाची परीक्षा २००५ मध्ये दिली. या परीक्षेत यश मिळाल्यानंतर त्यांनी चेन्नई येथे प्रशिक्षण पूर्ण केले आणि सन २००६ मध्ये भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट या पदावर ते रूजू झाले. देशभरात ठिकठिकाणी सेवा बजाविली.

24.7.25

दि. 24.07.2025

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'मध्ये राखी तयार करणेची कार्यशाळा संपन्न



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील गृहविज्ञान विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राखी तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. कार्यशाळेत मा. सौ. रेखा मलाबादे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या राख्या तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.या कार्यशाळेत क्रिस्टल राखी, लोकरी फुलांची राखी, नथ फुल राखी अशा अनेक प्रकारच्या आकर्षक राख्यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतःहून विविध राख्या तयार करत सर्जनशीलतेचे दर्शन घडवले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी बौद्धिक क्षमतेसोबतच कौशल्याचे जीवनातील महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना हस्तकलेच्या मूल्यांची जाणीव करून दिली.कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. उर्मिला खोत यांनी केले. सूत्रसंचालन सौ. सई पाटील, तर आभार प्रदर्शन सौ. योगिता पाटील यांनी केले. कार्यशाळेस महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि प्राध्यापक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरुण भारत शुक्रवार दि. २५ जुलै २०२५



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्याकडे प्रोजेक्ट सादर करताना तामिळनाडूची सौम्या. सोबत डॉ. संजय लट्ठे.

# तामिळनाडूच्या सौम्याचे समर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

पेरियार विद्यापीठ, सेलम, तामिळनाडू येथील विद्यार्थिनी सौम्याचा समर रिसर्च प्रोजेक्ट विवेकानंद कॉलेजमध्ये पूर्ण झाला आहे. भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय लट्ठे यांचे मार्गदर्शन लाभले.

न्यू दिल्लीतील इंडियन नॅशनल सायन्स अकॅडेमीकडून तिची निवड करण्यात आली. जून ते जुलै या दोन महिन्याच्या कालावधीत त्यांनी संशोधन भौतिकशास्त्र विषयात पूर्ण केले.

सौम्या यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक सचिन धनवडे, किरण साळुंखे यांचे सहकार्य लाभले.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २५ जुलै २०२५

# 'विवेकानंद'मध्ये राखी तयार करणे कार्यशाळेस प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील गृहविज्ञान विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राखी तयार करणे कार्यशाळेत रेखा मलाबादे यांनी विविध प्रकारच्या राख्या बनविण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यास विद्यार्थिनींचा प्रतिसाद लाभला. कार्यशाळेत क्रिस्टल राखी, लोकरी फुलांची राखी, नथ फूल राखी असे राख्यांचे अनेक प्रकार विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. विभाग प्रमुख डॉ. ऊर्मिला खोत यांनी प्रास्ताविक केले. योगीता पाटील यांनी आभार मानले. सई पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

पुण्य नगरी

शुक्रवार, २५ जुलै २०२५

# 'विवेकानंद'मध्ये राखी कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज येथील गृहविज्ञान विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राखी तयार करणे कार्यशाळा उत्साहात झाली. रेखा मलाबादे यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी मानवी बुद्धिमत्ता व कौशल्य यांचे जीवनातील महत्त्व विशद केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. ऊर्मिला खोत यांनी केले. आभार योगिता पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन सई पाटील यांनी केले.

तरुण भारत संवाद
शनिवार, २६ जुलै २०२५

## बेंगळुरूतील बुद्धिबळ स्पर्धेत

# ऋषिकेशची शानदार कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

बेंगळुरू येथे झालेल्या सेकंड ट्रिपल क्राउन चेस-२०२५ टुर्नामेंटमध्ये कोल्हापूरच्या ऋषिकेश शशिकांत कबनूरकर याने अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत चौथा क्रमांक मिळवला.

बुद्धिबळपटूंनी ६ अथवा ८ मिनिटात स्पर्धेतील आपली एक फेरी संपवणे असे स्पर्धेचे स्वरुप होते. अशा स्वरुपात स्पर्धेमध्ये नऊ फेऱ्या झाल्या. यात ऋषिकेशनने ९ पैकी साडे सात गुणांसह बकोल्झ गुण मिळवण्याची किमया करत चौथे स्थान मिळवले. हे स्थान मिळताना ऋषिकेशने आपल्या नवव्या फेरीत गोवा चॅम्पियन, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ मंदार लाड याला हरवण्याचा पराक्रम केला.

स्पर्धेतील या एकुणच कामगिरीमुळे ऋषिकेशच्या फिडे आंतरराष्ट्रीय गुणांकनामध्ये १६० गुणांची भर पडली आहे. त्यामुळे त्याचे फिडे आंतरराष्ट्रीय गुणांकन आता १८८० होणार आहे.



सध्या तो स्वामी विवेकानंद महाविद्यालयात शिकत आहे. त्याला संस्थेचे प्राचार्य कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, बुद्धिबळ प्रशिक्षक कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.


- सेकंड ट्रिपल क्राऊन चेसमध्ये पटकावला चौथा क्रमांक
- रॅपिड चेस टुर्नामेंटमध्ये ३० व्या स्थानावर
- दोन्ही स्पर्धेत भारतासह परदेशातील बुद्धिबळपटूंचा सहभाग
- राष्ट्रीय बुद्धिबळपटूंना दिली टक्कर

### ऋषिकेशला रोख रक्कम, प्रमाणपत्र देऊन गौरवले

बेंगळुरू येथील गोल्डन आरा ट्रस्टच्या वतीने ब्लीट्झ स्वरुप असलेल्या सेकंड ट्रिपल क्राउन चेस-२०२५ टुर्नामेंट, रॅपिड बुद्धिबळ टुर्नामेंटचे आयोजन करण्यात आले होते. सेकंड ट्रिपल क्राउन चेसमध्ये २१७ व रॅपिड बुद्धिबळ टुर्नामेंटमध्ये देश-विदेशातील ५६५ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतलेला होता. स्पर्धेतील यशस्वी बुद्धिबळपटूंना एकूण सहा लाख रुपयांच्या पारितोषिकांनी गौरवले. सेकंड ट्रिपल क्राउन चेस व रॅपिड बुद्धिबळ टुर्नामेंटमध्ये ऋषिकेश हा कोल्हापूरतर्फे सहभागी झाला होता. सेकंड ट्रिपल क्राउन चेसमध्ये ऋषिकेशने भलेही चौथा क्रमांक मिळवला असला तरी रॅपिड बुद्धिबळ टुर्नामेंटमध्ये त्याला तिसाव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. परंतू तिसावा क्रमांक मिळवतानाही त्याने जिद्दीच्या जोरावर ९ पैकी ७ गुण मिळवण्याची कामगिरी केली आहे. बक्षीस वितरण समारंभात सेकंड ट्रिपल क्राउन चेसमध्ये चौथा क्रमांक मिळवल्याबद्दल ऋषिकेशला ६ हजार रुपये, चषक व प्रमाणपत्र देऊन गौरवले. तसेच रॅपिड बुद्धिबळ टुर्नामेंटमध्ये ३० वा क्रमांक मिळवल्याबद्दल त्याला ३ हजार रुपये, चषक व प्रमाणपत्र असे बक्षीस देऊन गौरवले. ऋषिकेश हा अनुज ॲकॅडमीचा बुद्धिबळपटू आहे.

कोल्हापूर | ४
रविवार, दि. २७ जुलै २०२५
लोकमत

पुस्तक परीक्षण




# कोल्हापुरी बोलीचा अमूल्य ठेवा

कोल्हापुरी बोली केवळ संवादाचे साधन नसून ती कोल्हापूरच्या सांस्कृतिक अस्मितेची शान आहे. या अस्सल भाषिक ठेव्याचा अभ्यास, दस्तऐवजीकरण आणि संवर्धन करण्याचे मोलाचे कार्य विवेकानंद कॉलेजचे प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी 'कोल्हापुरी बोली : तत्त्व आणि व्यवहार' या पुस्तकातून केले आहे. या पुस्तकातून तब्बल एक हजार बोली शब्दांचा संग्रह, त्यांचे अर्थ, वाक्यप्रयोग आणि म्हणींचा भावार्थाचे आणि संवेदनांचेही लाघवी दर्शन घडून येते. 'काय मर्दा', 'लेका', 'तिच्या मारी', 'भंपक', 'कोंडकुरकुस', 'हुपल्याक' असे शिवी वाटणारे, पण मैत्रीत गोडवा आणणारे; तिरकस वाटणारे, पण प्रेमळ भावना व्यक्त करणाऱ्या या शब्दांना डॉ. आळवेकरांनी भाषाशास्त्रीय जाणिवेतून अर्थ आणि सांस्कृतिक संदर्भ दिले आहेत. कोल्हापुरचे मोहन पाटील, चंद्रकुमार नलगे, किरण गुरव, आनंद यादव यांसारख्या दिग्गज साहित्यिकांच्या भाषिक ठसे उमटलेले खेडवळ आणि गावंढळ शब्दांचाही अभ्यासपूर्वक समावेश आहे.

कोल्हापुरी बोली केवळ भाषेपुरती मर्यादित न राहता एक सामाजिक स्मृती आणि संवेदनशीलता जपते. तिचा अभ्यास केल्याने समाजमनाच्या आतल्या स्तरांवर डोकावण्याची संधी मिळते. काळाच्या ओघात लुप्त होत चाललेल्या या शब्दसंपत्तीचे जतन करणे, हे आजचे महत्त्वाचे कार्य आहे. याच दृष्टिकोनातून हे पुस्तक केवळ वाचनपुरते मर्यादित न राहता वाचकांचा शब्दसंग्रह समृद्ध करणारे, विद्यार्थ्यांना बोलीचे भान देणारे आणि संशोधकांना दिशा देणारे ठरते. डॉ. आळवेकरांचे हे पुस्तक म्हणजे कोल्हापुरी बोलीचं संस्कृतिकरण करणारा ग्रंथ आहे. यानिमित्ताने कोल्हापुरी बोलीचे भावविश्व वाचकांसमोर अधिक स्पष्ट, अधिक प्रगल्भ आणि अधिक आपलेसे होते. यापुढे समीक्षक, भाषा संशोधक आणि बोली प्रेमी यांनी मिळून कोल्हापुरी बोलीचा सुसंगत आणि अभ्यासपूर्ण कोश तयार करावा, ही काळाची गरज आहे. यासाठी डॉ. आळवेकर यांच्या पुस्तकाने बोली भाषा संवर्धनासाठी एक नवी दिशा निश्चित केली आहे, हे निर्विवाद सत्य.

**- डॉ. प्रकाश मुंज,** कोल्हापूर

**पुस्तकाचे नाव :** 'कोल्हापुरी बोली : तत्त्व आणि व्यवहार'
**लेखक :** प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर
**प्रकाशक :** तेजश्री प्रकाशन, कोल्हापूर
**किंमत :** १८० रुपये. **पृष्ठे :** ९१

# अकरावीच्या ४२ हजार जागा रिक्तच!

## जिल्ह्यातील स्थिती : २३ हजार ९०४ प्रवेश निश्चित; १ ऑगस्टला चौथी फेरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेंतर्गत चौथ्या फेरीला सुरुवात झाली. तिसऱ्या फेरीअखेर अद्याप जिल्ह्यात ४२ हजार ८६ जागा रिक्त राहिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी अकरावीच्या प्रवेशाकडे पाठ फिरविल्याचे चित्र आहे.

राज्य मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेला कोल्हापूर जिल्ह्यातून ५३ हजार विद्यार्थी बसले, त्यामधील ५२ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दहावीच्या परीक्षेच्या निकाल वेळेत लागल्यानंतरही अकरावीची प्रवेश प्रक्रिया वेळेत सुरू झाली नाही. सुरुवातीपासूनच अकरावीची प्रवेश प्रक्रिया गोंधळात अडकलेली पाहायला मिळत आहे. सर्व्हर डाऊन, वारंवार वेळापत्रकात बदलामुळे विद्यार्थी, पालक हैराण झाले होते. यंदा पहिल्यांदाच राज्यस्तरावर अकरावीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे.

पुढारी MISSION ADMISSION

**तिसऱ्या फेरीअखेरचे प्रवेश**

**23,904**

**विज्ञान**
**13,583**

**कला**
**5,819**

**वाणिज्य**
**4,430**

> यावर्षी राज्य सरकारने अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने केली. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि पालकांना ही प्रक्रिया समजलीच नाही. परिणामी, प्रवेश तीन फेऱ्या पूर्ण झाल्या तरीही ६० टक्के प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे ही प्रवेश प्रक्रिया आहे त्याठिकाणी थांबवून उर्वरित प्रवेश देण्याचे अधिकार ज्या-त्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना द्यावेत.
>
> **- डॉ. आर. आर. कुंभार,** प्राचार्य, विवेकानंद महाविद्यालय

> अकरावीची केंद्रीय पद्धतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ६७ हजार प्रवेश जागा उपलब्ध आहेत; परंतु दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या ५२ हजार इतकी आहे. अकरावी प्रवेशाच्या पहिल्या तीन फेरीमध्ये सुमारे २३ हजार प्रवेश झाले आहेत. अद्याप ५० टक्के प्रवेश रिक्त असल्याचे दिसत असले तरी पाचवी फेरी ओपन टू ऑल अशी असणार आहे. यामध्ये दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश होतील, अशी अपेक्षा आहे.
>
> **-महेश चोथे,** शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर

कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी जिल्ह्यातील २८५ कनिष्ठ महाविद्यालयांतील ६६ हजार १० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यात अकरावीला तिसऱ्या फेरीअखेर कला ५ हजार ८९१, वाणिज्य ४ हजार ४३० विज्ञान १३ हजार ५८३ असे मिळून २३ हजार ९०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. चौथ्या फेरीसाठी नावनोंदणी करण्याची मुदत संपली आहे. १ ऑगस्ट रोजी चौथ्या फेरीच्या जागा पोर्टलवर जाहीर होणार आहेत. २ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांना मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागणार आहे. ४ ऑगस्ट रोजी चौथ्या फेरीतील रिक्त जागांची यादी जाहीर होणार आहे. या फेरीमध्ये कमीच प्रवेश होतील, असे महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे मत आहे. त्यामुळे यावर्षी पहिल्यांदाच अकरावीच्या ६० टक्केहून अधिक प्रवेश जागा रिक्त राहतील, अशी भीती आहे.